परिवहन आयुक्त कार्यालयाने भाडेतत्वावर घेतलेल्या एमटीएनएल ची मालकी असलेल्या इमारतीतील फर्निचर व बैठक व्यवस्था इ. खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०९१७/प्र.क.२१०/परि-४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ एप्रिल २०१८

वाचा :

१) शासन ज्ञापन क्रमांकः एमव्हीडी-१११६/प्र.क्र.४९४/परि-४, दि.०१ .०४.२०१७
२) परिवहन आयुक्त कार्यालयाचे क्र.FortMTNL/०७१७/न.क्र.१९/का.१०/जा.क्र.११०४५/४३३०, दि.२५ .०७.२०१७ व दि.१५.०३.२०१८ ची पत्रे

प्रस्तावना :

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.४०/२०१२ वर दि.१३.०७.२०१६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाने दि.०२.०८.२०१६ च्या शासन निर्णयान्वये अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, मुंबई उपनगर या कार्यालयास परिवहन कार्यालयाच्या ताब्यात असलेली प्रशासकीय इमारत बांद्रा (पू) येथील ५००० चौ.फुट जागा वाटप करण्याचे आदेश दिले आहेत. परिवहन आयुक्त कार्यालयाने सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने एमटीएनएलची मालकी असलेली फोर्ट येथील फाउंटन-२ इमारतीतील पाचव्या मजल्यावरील १३,४०५ चौ.फुट व फाउंटन-१ इमारतीतील ६,५०० चौ.फुट इतकी जागा भाडेतत्वावर घेतली त्याबाबतचा करार एमटीएनएल आणि परिवहन आयुक्त यांच्या दरम्यान दि.१५.०५.२०१७ रोजी झाला आहे. सदर जागेवर अद्ययावत फर्निचर व बैठक व्यवस्था करण्यासाठीच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय:

परिवहन आयुक्त कार्यालयाने भाडेतत्वावर घेतलेल्या एमटीएनएलची मालकी असलेल्या फाऊंटन-२ इमारतीतील पाचवा मजला येथील १३,४०५ चौ.फु. व फाऊटंन-१ इमारतीतील सातवा

मजला येथील ६५०० चौ.फु. असे एकूण १९९०५ चौ.फुट जागेत अद्ययावत फर्निचर व बैठक व्यवस्था करण्यासाठी रु.३,३३,४९,९९५/- (रुपये तीन कोटी तेहतीस लक्ष एकोणपन्नास हजार नऊशे पंचाण्णव फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	प्रस्तावित कामे	छाननीअंती किंमत
१	Renovation of office for RTO in M.T.N.L. Office Block A at Churchgate Mumbai	Rs.१,२०,७४,१२२.००
२	Renovation of Transport Commissioner Office on ५th & ७th Floor at Fountain Bldg. (MTNL Building) Fort Mumbai (B Block)	Rs.२,१२,७५,८७३.००
	Total	Rs. ३,३३,४९,९९५.००

सार्वजनिक बांधकाम विभागाने खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे.

(अ) सदर खर्च विभागाने उपलब्ध असलेल्या नियतव्ययातून भागवावा.

(ब) सदर अंदाजपत्रके अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, मुंबई व उपभोक्ता विभागाच्या वतीने सक्षम प्राधिकारी यांचे साक्षांकित करणे आवश्यक आहे.

२. यासाठी येणारा खर्च मागणी क्र. बी-३, २०४१, वाहनांवरील कर,(००) ००१, संचालन व प्रशासन (०१) परिवहन आयुक्त (०१)(०१) आस्थापना - परिवहन आयुक्त (अनिवार्य) दत्तमत (२०४१ ००१८) १३-कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भ क्र.८५५/इमा-२, दि.११.४.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार तसेच, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-५, अ.क्र.१० व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ नुसार तसेच, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला,उपविभाग-२ , अ.क्र.३७, नियम क्र.९० नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१८१७१९४५३५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.04.18 17:21:08 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
९. उप सचिव (इमा) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
११.निवडनस्ती (परि-४).